- भवतु सब्ब मंगलं -

# Ajanta International Vipassana Samiti

(Trust Reg. No. : E-569)

"DHAMMA AJANTA" Gut No. 45, Rampuri, Nasik Vaijapur Road, Dist. Aurangabad दिनांक 23 जून 2026
City Office : Rajhans, 2 Surana Nagar Jalna Road, Aurangabad-431003

23/06/26

प्रति,
माननीय प्राचार्य
छत्रपती संभाजी नगर.

विषय: माहे जुलै २०२६ च्या केंद्रस्तरिय शिक्षण परिषदेत मित्र उपक्रमाचे प्रशिक्षण आयोजन करणे बाबत.

संदर्भ: १) ज्ञा.क्र.राशैसंप्रपम/कला व क्रीडा/मित्र उपक्रम प्रशिक्षण/सन २०२६-२७/ दिनांक २९ जून २०२६.
२) जा.क्र.आशिका/स्विस/मित्र उपक्रम/२०१९-२०२०/४८५६ दिनांक ८ ऑगस्ट २०१९

महोदय,

कृपया वरील संदर्भीय परिपत्रक पहावे (प्रत सोबत जोडली आहे). यानुसार माहे जुलै 2026 च्या केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेत सर्व शिक्षकांसाठी मित्र उपक्रमांतर्गत आनापान साधनेचे तीन तासाचे प्रशिक्षण आयोजित करणे बाबत सूचना दिलेल्या आहेत. छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात २० किलोमीटर दूर धम्म अजंता विपश्यना केंद्र वैजापूर नाशिक रोड,रामपुरी गाव येथे स्थित आहे.येथे मागील पंधरा वर्षापासून कार्यरत आहे या केंद्रावर नियमितपणे दहा दिवसीय निवासी विपश्यना शिबिरांचे आयोजित केले जाते. येथे स्थानिक तसेच इतर लोक सुद्धा लाभ घेतात.

केंद्रस्तरावरील शिक्षण परिषदेत केंद्रप्रमुख तसेच गट शिक्षण अधिकारी मार्फत शिक्षकांचे मित्र उपक्रमांतर्गत आनापान साधनांचे प्रशिक्षण घेणे अपेक्षित आहे. आनापान साधनेचे प्रशिक्षण घेण्यासाठी केंद्रप्रमुख तसेच इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे जेणेकरून ते प्रशिक्षक म्हणून प्रशिक्षण घेऊ शकतील. यासाठी आपल्या सोयीनुसार योग्य त्या ठिकाणी केंद्रप्रमुख व इतर अधिकाऱ्यांना प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी आम्ही पूर्ण सहकार्य करून यांचे प्रशिक्षण पूर्ण करू. कृपया आपण याबाबत योग्य ते आदेश निर्गमित करावे ही विनंती.

धन्यवाद.

Recived
23/6/2026

कार्यालय
जि.शि.व प्र.संस्था
छ.संभाजीनगर

सचिव
धम्म अजंता विपश्यना सेंटर

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

NIPUN BHARAT

# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पदमपुरा, छत्रपती संभाजीनगर

## District Institute of Education & Training, Padampura, Chhatrapati Sambhajinagar

जा.क्र.: जिशिप्रछसं/मित्र उपक्रम /२०२६-२७/ ८५६ दिनांक: ०६ /०८/ २०२६

प्रति,

गटशिक्षणाधिकारी (सर्व)
जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

**विषय:** मित्र उपक्रमाची अंमलबजावणी व इतर विषयांच्या अनुषंगाने प्रशिक्षणाचे आयोजनाबाबत.
**संदर्भ:** मा.संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे यांचे पत्र- दि.२९/०९/२०२६

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, राज्यातील सर्व शाळांमध्ये इयत्ता ५ वी ते १०/१२ च्या वर्गाकरिता मित्र उपक्रमातंर्गत आनापान साधना वर्ग सुरु करण्यात आलेले आहे. त्यादृष्टीने केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेत केंद्रप्रमुख तसेच गटशिक्षणाधिकारी यांच्या मार्फत सर्व शिक्षकांसाठी या आनापान साधनेचे प्रशिक्षण आयोजित करणेबाबत संदर्भीय पत्रान्वये सूचित केलेले आहे.

यासाठी जिल्ह्यातील सर्व केंद्रप्रमुखांचे एक दिवसीय आनापान साधनेचे प्रशिक्षण दि. १८/०८/२०२६ रोजी सकाळी १०.०० ते ५.०० या कालावधीत महाराष्ट्र राज्य शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), भडकल गेटजवळ, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आले आहे. तरी आपल्या तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुखांना या प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी आदेशित करावे.

ShriShrimalNJ
शिक्षणाधिकारी (प्राथ.) करीतां
जिल्हा परिषद
छत्रपती संभाजीनगर

प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था
छत्रपती संभाजीनगर